**RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY**
**"(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated the 1st of August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act No. VI of 2017).)"**

**Examination and Evaluation Department**

**No.BoEE/413** **Dated, 27th, May, 2022**

# परीपत्रक

## उन्हाळी २०२२ परीक्षेच्या कार्यप्रणाली बाबत

उन्हाळी २०२२ परीक्षा सुरु करण्याच्या दुष्टीने सध्याची एकुण परीस्थिती लक्षात घेता व आगामी शैक्षणिक सत्राचा कालावधी लक्षात घेता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये या दुष्टीने रा.तु.म.नागपुर विद्यापीठाच्या उन्हाळी २०२२ ऑफलाईन परीक्षा घेण्याबाबत विद्यापरिषदेत दिनांक २०.५.२०२२ आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दिनांक २६.५.२०२२ रोजी झालेल्या बैठकीच्या निर्णयांच्या अनुषंगाने परीक्षेची कार्यप्रणाली ठरविण्याबाबत नमुद केलेल्या मुददयावर कार्यवाही घेवुन परीक्षेची अमलबजावणी सुचारु पध्दतीने करण्याकरीता खालील बाबी नमुद केलेल्या आहेत. त्यानुसार सर्व संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी खालील नमुद कार्यप्रणाली ठरल्याप्रमाणे परीक्षेची कार्यवाही घ्यावी.

१. विद्यापीठाची परीक्षा ऑफलाईन पध्दतीने खाली नमुद केल्याप्रमाणे घेण्यात येतील
   पदवी (U.G.) अंतिम वर्षाच्या सम सत्राच्या सर्व परीक्षा दिनांक ०८ जुन २०२२ पासुन पुढे
   पदव्युत्तर (P.G.) अंतिम वर्षाच्या सम सत्राच्या सर्व परीक्षा दिनांक १५ जुन २०२२ पासुन पुढे
   प्रथम वर्ष व अंतिम वर्ष वगळुन इतर सर्व वर्षाच्या (Pre-Final) सम सत्रातील परीक्षा दिनांक २२ जुन २०२२ पासुन पुढे
२. सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा ज्या महाविद्यालयात आपला प्रवेश आहे त्याच महाविद्यालयातुन होम सेंटर विद्यापीठाव्दारे प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकानुसार होतील
३. उन्हाळी २०२२ परीक्षा वस्तुनिष्ठ (Multiple Choice Questions M.C.Q.) स्वरुपाच्या असुन प्रश्न पत्रिका परीक्षा केंद्र (होम सेंटर) असलेल्या महाविद्यालयात घेण्यात येतील.

४. प्रश्न पत्रिकेत एकुण ५० प्रश्न असतील त्यापैकी विद्यार्थ्यांस ४० प्रश्न सोडविने बंधनकारक राहील.

५. सर्व विद्याशाखातील परीक्षांना परीक्षेचा कालावधी 90 मिनिटांचा राहील .

६. प्रत्येक प्रश्नास दोन गुण असतील. ४० पेक्षा जास्त प्रश्न सोडविल्यास फक्त ४० प्रश्न तपासण्यात येतील व बरोबर असलेल्या प्रश्नांचेच गुण ग्राहय धरण्यात येतील. तसेच निगेव्टीव गुणांकन पध्दती राहणार नाही.

७. प्रश्न पत्रिकेतील वस्तुनिष्ठ (M.C.Q.) प्रश्नांना पर्याय दिलेले असतील दिलेल्या पर्यायापैकी बरोबर/योग्य पर्यायासमोर ✓ अशी खुन करावी.

८. प्रत्येक विद्यार्थ्यास प्रश्नपत्रिकेत खालील बाबी सुवाच्च अक्षरात लिहायचे आहेत, इतर सुचना प्रवेश पत्रावर नमुद केलेल्या असतील.

रोल नंबर ..............................................

नामांकन क्रमांक..........................................

विद्यार्थ्यांची सही ........................

परीक्षेचा दिनांक व वेळ ......................

पर्यवेक्षकाची स्वाक्षरी ..................................

९. विद्यापीठाच्या परीक्षा परीक्षा केंद्रावर खालील प्रमाणे तीन पाळीमध्ये घेण्यात येतील

विज्ञान व तंत्रज्ञान शाखा वेळ सकाळी ८.३० ते ११.००

वाणिज्य व व्यवस्थापन शाखा आणि आंतरविद्या शाखा वेळ दुपारी १२.३० ते २.००

मानव्यविद्या शाखा वेळ दुपारी ३.३० ते ५.००

१०. महाविद्यालयाला आपल्या स्तरावर परीक्षा निहाय, विषय निहाय, माध्यम निहाय, प्रश्न पत्रिका परीक्षा विभागाचा लॉगिनमधुन डाउनलोड करुन महाविद्यालयातील विद्यार्थ्यी संख्येनुसार प्रश्न पत्रिकांची झेरॉक्स करावी लागेल.

११. महाविद्यालयाने विद्यार्थी संख्येनुसार उपलब्ध असलेल्या वर्ग खोल्यात सोईनुसार निर्धारित वेळेत आसन व्यवस्था करावी. आसन व्यवस्थेची माहीती महाविद्यालयाने विद्यार्थ्याकरीता प्रवेश द्वारावर प्रकाशित करावी. आसन व्यवस्था परीक्षेचे गांर्भीर्य राहुन करावी.

१२. संबधीत विषयाची परीक्षा संपल्यावर महाविद्यालयांने विषयाच्या शिक्षक/विषयतज्ञ यांच्या कडुन पाच दिवसाच्या आत तपासुन विद्यार्थ्यांचे गुण Scheme of Examination नुसार रुपांतरीत करुन कॉलेज लॉगीन मध्ये अपलोड करावे. उदा. जर B.Sc 6th Sem परीक्षेत Scheme of Examination नुसार Chemistry -I विषयाची परीक्षा ५० गुणांची असेल तर बरोबर उत्तर असलेले ४० प्रश्नापैकी त्यांचे एकूण ५० पैकी गुण रुपांतरित करावे.

१३. परीक्षा संपन्न झाल्यावर प्रश्नपत्रिकेची तापसणी महाविद्यालयातील शिक्षक/विषयतज्ञ यांना करावी लागेल.तपासलेल्या प्रश्नपत्रिकांचे बंडलावर परीक्षा केंद्राचे नाव, परीक्षेचे नाव, विषयाचे नाव, परीक्षेचा दिनांक/वेळ आणि प्रश्न पत्रिकेची संख्या नमुद करुन प्राचार्यां/केंद्रप्रमुख यांच्या स्वाक्षरीने सिलबंद करुन महाविद्यालयात सहामहिने पर्यंत जतन करुन ठेवाव्यात.

१४. विद्यार्थ्यांना प्राप्त झालेल्या गुणांची सूची ऑनलाईन द्वारे सादर केल्यावर त्याची प्रिंट प्रत प्राचार्य व संबधित शिक्षक/विषयतज्ज्ञ यांनी स्वाक्षरी करुन परीक्षा भवन येथे परीक्षा संपल्यावर आठ दिवसाच्या आत जमा करावे.

१५. परीक्षा वस्तुनिष्ठ (M.C.Q.) असल्यामुळे पुर्नमुल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.

१६. प्रत्येक महाविद्यालयाला महाविद्यालयीन स्तरावर परीक्षा घेण्याकरीता प्राचार्यांच्या देखरेखी मध्ये परीक्षा समिती गठीत करुन परीक्षेच्या संचालनाची कार्यवाही व देखरेख करावी जेणे करुन परीक्षेचे गांर्भीर्य राखता येईल.

१७. महाविद्यालयातील परीक्षा समितीने आपल्या महाविद्यालयातील परीक्षेकरीता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन व समुपदेशन करावे जेणे करुन विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधी संभ्रमाची परिस्थिती उद्‌भवणार नाही तसेच काही अडचणी असल्यास प्राचार्य/शिक्षक यांनी त्याकरीता परीक्षा भवन येथे उपकुलसचिव, सहायक कुलसचिव यांचेशी संपर्क करुन समस्यांचे निराकरण करावे.

१८. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता प्रश्नसंच (Question Bank) परीक्षानिहाय व विषयनिहाय आपल्या शिक्षक/विषयतज्ञ यांच्याकडून तयार करुन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दयाव्या. ज्यांना प्रश्नसंच तयार करण्यास अडचणी निर्माण होत असल्यास अशा महाविद्यालयांनी महाविद्यालयाचे समुह (Cluster) तयार करुन प्रश्नसंच (Question Bank) विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दयावे.

१९. दिव्यांग विद्यार्थ्यांला अतिरिक्त वेळ देण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांना बसण्याच्या व्यवस्था तळमजल्यावर करण्यात यावी. आणि दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमानुसार सोई सुधिवा पुरविण्यात याव्यात.

२०. विद्यापीठा मार्फत प्रकाशित परीक्षेचे वेळापत्रक, त्यात होणारें बइल व इतर अनुषंगीक अद्ययावत माहीती प्राप्त करुन घेण्याकरीता विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी भेट द्यावी. महाविद्यालयीन परीक्षा समितीने याबाबतचा सर्व सुचना सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतील याची दक्षता घ्यावी.

२१. महाविद्यालयाने विद्यापीठांनी प्रकाशित केलेल्या सर्व परीक्षांचे वेळापत्रक माहीती आपल्या महाविद्यालयीाल सुचना फलक, सोशल मिडीया, ऑनलाईन माध्यमातुन विद्यार्थ्यांना देण्याचा

प्रयत्न महाविद्यालयाव्दारे स्थापीत केलेल्या परीक्षा समितीव्दारा करावा जेणे करुन विद्यार्थी परीक्षेपासुन वंचित राहणार नाही याची काळजी महाविद्यालयांने द्यावी.

२२. प्रात्याक्षिक परीक्षा विद्यापीठाव्दारे दिनांक १० मे २०२२ रोजी निर्गमित केलेल्या परीपत्रकानुसार घेण्यात येतील.

२३. ज्या परीक्षांना लेखी परीक्षा नाही अशा परीक्षांचे प्रात्याक्षीक परीक्षा दिनांक ०१.०७.२०२२ पासुन ते १५.०७.२०२२ पर्यंत महाविद्यालय स्तरावर ऑफलाईन पध्दतीने घेण्यात यावे.

२४. दिनांक २०.५.२०२२ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार सदर परीक्षेला प्रति विद्यार्थी प्रति विषय रु. २५/- खर्च देण्याबाबत मान्यता प्रदान केली असुन सदर खर्चामध्ये रु. १०/- प्रश्नपत्रिका प्रिंट करण्याकरीता, रु. ५/- प्रश्नपत्रिका/उत्तपत्रिकेचे मुल्यांकन करण्याकरीता व रु. १०/- केंद्रप्रमुख/ पर्यवेक्षक व इतर खर्च देण्याचे निर्देशित केले आहे.

२५. सदर खर्च महाविद्यालयाला देण्यात येणा-या परीक्षा संबंधीचा अग्रिमातुन करावयाचा असुन या अग्रिमकरीता महाविद्यालयाने विद्यापीठाला अर्ज करावयाचा असुन सदर अग्रिम ज्या महाविद्यालयांनी उन्हाळी २०२० पर्यंतचा अग्रिमचा हिशेब दिलेला आहे अशाच महाविद्यालयाला देण्यात येईल, ज्यांनी अग्रिम उन्हाळी २०२० परीक्षेपर्यंतचा हिशेब दिलेला नाही त्यांनी तातडीने तो हिशेब वित व लेखा विभागाला सादर करुन हिशेब सादर केलेल्या पत्राची छायांकित प्रतीसह परीक्षा विभागाला अग्रिमसंबंधी अवेदन सादर करावे त्यानंतर त्यांना अग्रिम देण्याबाबत कार्यवाही घेण्यात येईल.

२६. ज्या विद्यार्थ्यांनी बहिशःल विद्यार्थी म्हणुन ज्या महाविद्यालयातुन परीक्षा आवेदन पत्र भरले आहेत त्याच महाविद्यालयातुन परीक्षा दयावी.

२७. ज्या विद्यार्थ्यांनी बहिशःल विद्यार्थी म्हणुन विद्यापीठाच्या परीक्षा भवन येथील केंद्रावरुन परीक्षा आवेदन पत्र भरले आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांना देण्यात येणा-या प्रवेशपत्रावरील नमुद केलेल्या परीक्षा केंद्राचे नावानुसार परीक्षा केंद्रावर परीक्षा दयावी.

मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशानुसार

**(डॉ.प्रफुल्ल साबळे)**

संचालक,

परीक्षा व मुल्यमापन मंडळ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ